ePaper
| वर्ष - 8 । अंक -74 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 21 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुण्यात मोठा अनर्थ टळला! ब्रेक फेल ट्रक शिरला मॉलच्या पार्किंगमध्ये



## आतील पानांत


- कोहलीने कसोटीत घडवला इतिहास
- रिव्ह्यू घेणं टाळणं पडलं महागात!
- सर्वोच्च न्यायालयाचं यूट्यूब चॅनल हॅक?
- त्यांचं घर म्हणजे अर्ध पाकिस्तान आहे


## शरद पवार गटाची शिवस्वराज्य यात्रा सोमवारी नाशकात

# राष्ट्रवादी फुंकणार विधानसभेचे रणशिंग!

### पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खा. डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडे यात्रेचे नेतृत्व

। नाशिक । महाईन्यूज

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेसतर्फे राज्यात शिवस्वराज्य यात्रा काढण्यात आली असून, सोमवारी (दि. २३) या यात्रेचे नाशिक जिल्ह्यात आगमन होत आहे. नाशिकसह दिंडोरी, चांदवड, येवला, देवळाली, सिन्नर या मतदारसंघांत फिरणाऱ्या या यात्रेद्वारे निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे.**





पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडे या यात्रेचे नेतृत्व असून, ही यात्रा तीन दिवस जिल्ह्यात फिरणार आहे. या यात्रेत पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार हेदेखील सहभागी होण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर प्रत्येक जिल्ह्यात जाऊन निवडणूक रणशिंग फुंकण्याचे काम राष्ट्रवादीने सुरू केले आहे. प्रदेशाध्यक्ष पाटील, खासदार डॉ. कोल्हे यांच्या नेतृत्वाखालील या यात्रेत ठिकठिकाणी शरद पवारदेखील सहभागी होत आहेत. सध्या ही यात्रा उत्तर महाराष्ट्रात असून, जळगाव, नंदुरबारनंतर धुळे जिल्ह्यात पोहोचली आहे. त्यानंतर तीन दिवसांसाठी ही यात्रा नाशिक जिल्ह्यात येणार आहे.

गत निवडणुकीत नाशिक जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सर्वाधिक सहा आमदार निवडून आले होते. परंतु, पक्षफुटीनंतर हे सहाही आमदार शरद पवारांची साथ सोडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गेले आहेत. त्यामुळे शरद पवार गटाने या सहा मतदारसंघांवर लक्ष केंद्रित केले असून, या ठिकाणच्या आमदारांना धडा शिकवण्यासाठी सज्जता सुरू केली आहे. लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यात महायुतीचे पानिपत झाले आहे. दिंडोरी लोकसभेत शरद पवार गटाचा खासदार निवडून आल्याने राष्ट्रवादीने ग्रामीण भागातील मतदारसंघाकडे मोर्चा वळविला असून, या सहाही मतदारासंघांतून यात्रा जाणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसेंसह युवकचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेखही उपस्थित राहणार आहेत. या यात्रेच्या तयारीसाठी पक्षाकडून गुरुवारी (दि. १९) प्रदेश उपाध्यक्ष गोकुळ पिंगळे, शहराध्यक्ष गजानन शेलार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी नाना महाले, लक्ष्मण मंडाले, मुन्ना अन्सारी यांच्यासह जिल्ह्यातील नेते उपस्थित होते. जिल्ह्यात शिवस्वराज्य यात्रा यशस्वी करण्याची रणनीती या बैठकीत ठरवण्यात आली.

### यात्रेचा प्रवास

सोमवारी (दि. २३) दुपारी तीन वाजता ही यात्रा धुळे येथून सटाणा येथे पोहोचणार आहे. सटाणा येथे जाहीर सभा होणार असून, सायंकाळी पाचला नाशिक शहरात यात्रा दाखल होणार आहे. सायंकाळी सहाला दादासाहेब गायकवाड सभागृहात जाहीर सभा होईल. दि. २४ सप्टेंबर रोजी ही यात्रा दिंडोरीत दाखल होणार असून, सकाळी अकराला जाहीर सभा होणार आहे. दुपारी तीनला ही यात्रा चांदवड येथे पोहोचणार आहे. या ठिकाणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांसोबत संवाद साधला जाणार आहे. त्यानंतर ही यात्रा येवला येथे पोहोचणार असून, तेथे सहा वाजता जाहीर सभा होणार आहे. रात्री ही यात्रा नाशिकमध्ये दाखल होणार आहे. दि. २५ सप्टेंबर रोजी ही यात्रा देवळाली मतदारसंघात पोहोचणार असून, सकाळी ११.३० वाजता तेथे जाहीर सभा होईल.

## अख्खा ट्रक बघता बघता...", सुप्रिया सुळेंकडून मुख्यमंत्री लक्ष्य

### पुणे तिथे काय उणे ! रस्त्यांची दयनीय अवस्था, शेवटी महापालिकेचाच ट्रक गेला खड्ड्यात

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



पुणे शहरातील लक्ष्मी रोडवरील सिटी पोस्ट कार्यालयाच्या आवारातील रस्त्यावर अचानक पडलेल्या भल्या मोठ्या भगदाडमध्ये पुणे महापालिकेचा ट्रक आणि दुचाकी ४० फुट खोल खड्डयात पडल्याची घटना घडली. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ आणि त्यानंतर जमलेल्या लोकांनी काढलेले व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाले. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर दोन क्रेनच्या मदतीने अग्निशामक दलाच्या अधिकाऱ्यांना ट्रक आणि दुचाकी काढण्यात यश आले आहे. मात्र या घटनेवरून आता विरोधकांनी महायुती सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. बारामतीच्या खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी एक्सवर पोस्ट टाकून मुख्यमंत्री शिंदेंना लक्ष्य केले आहे.

### काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

सदर घटनेचा व्हिडीओ शेअर करून सुप्रिया सुळे यांनी महायुती सरकारच्या स्मार्ट सिटीच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्या म्हणाल्या, "स्मार्ट सिटी म्हणतात ते हेच का मुख्यमंत्री महोदय? पुणे शहरातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता खचून अख्खा ट्रक बघता बघता गायब होतो. ही घटना अतिशय भयंकर आणि रस्त्याच्या एकंदर दर्जा आणि गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी आहे. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. हा नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. या घटनेची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. याप्रकरणी दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी आमची ठाम मागणी आहे."

# शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने पोखरला!

## शिक्षण संस्थाचालकांनी पत्रकार परिषदेत केला आरोप



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. सरकारची चुकीची धोरणे, चुकीच्या निर्णयांचा फटका विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालकांना बसत आहे. शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने पोखरला असून, विद्यमान सरकारने विविध विभागांचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवून शिक्षक, संस्थाचालक आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक संकटात टाकल्याचा गंभीर आरोप राज्यातील शिक्षण संस्थाचालकांनी पत्रकार परिषदेत केला.**

राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाह, माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, अध्यक्षा जागृती धर्माधिकारी, विभागीय अध्यक्ष गणपतराव बालवडकर, वि. ल. पाटील, राजेंद्र भोसले, अजित वडगावकर या वेळी उपस्थित होते. सरकारचे शिक्षणविषयक निर्णय, धोरणांबाबत चर्चा करण्यासाठी शिक्षण शिक्षक मेळावा २१ सप्टेंबर रोजी आझम कॅम्पस येथील हिदायतुल्ला सभागृह येथे दुपारी एक ते पाच या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. खासदार सुप्रिया सुळे, आमदार सत्यजित तांबे, आमदार जयंत आसगावकर, किरण सरनाईक उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात आंदोलनासंदर्भातील दिशाही ठरवली जाणार आहे.ॲड. गव्हाणे म्हणाले, की राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांच्या ६७ हजार आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचे २०१७ पासूनचे दोन हजार कोटी रुपये थकीत आहेत. शाळांना वेतनेतर अनुदान मिळत नाही. शिक्षणाची आर्थिक जबाबदारी सरकार टाळत आहे. त्यामुळेच कंत्राटी शिक्षक, समूह शाळा असे निर्णय घेतले जात आहेत. बदलापूर येथील अत्याचाराची घटना निंदनीय आहे. मात्र, संस्थाचालकांना वेठीस धरणे चुकीचे आहे. या घटनेनंतर सरकारने अध्यादेश काढून मुख्याध्यापकांना जबाबदार धरले असले, तरी अनेक प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत. शाळांमध्ये केवळ सीसीटीव्ही बसवून गुन्हे थांबणार नाहीत, त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ शाळांमध्ये असले पाहिजे, असे मत संस्थाचालकांनी मांडले. आरटीई शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम देण्यासाठी सरकारने निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र हा निधी शाळांना देण्यासाठी गटशिक्षणाधिकारी स्तरावरून २ ते ५ टक्के रक्कम कमिशन म्हणून मागितली जात असल्याचाही आरोप करण्यात आला खासदार सुप्रिया सुळे, आमदार सत्यजित तांबे, आमदार जयंत आसगावकर, किरण सरनाईक उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात आंदोलनासंदर्भातील दिशाही ठरवली जाणार आहे.ॲड. गव्हाणे म्हणाले, की राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांच्या ६७ हजार आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, आरटीई शुल्क प्रतिपूर्तीचे २०१७ पासूनचे दोन हजार कोटी रुपये थकीत आहेत. शाळांना वेतनेतर अनुदान मिळत नाही. शिक्षणाची आर्थिक जबाबदारी सरकार टाळत आहे. त्यामुळेच कंत्राटी शिक्षक, समूह शाळा असे निर्णय घेतले जात आहेत. बदलापूर येथील अत्याचाराची घटना निंदनीय आहे. मात्र, संस्थाचालकांना वेठीस धरणे चुकीचे आहे. या घटनेनंतर सरकारने अध्यादेश काढून मुख्याध्यापकांना जबाबदार धरले असले, तरी अनेक प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकच नाहीत. शाळांमध्ये केवळ सीसीटीव्ही बसवून गुन्हे थांबणार नाहीत, त्यासाठी पुरेसे मनुष्यबळ शाळांमध्ये असले पाहिजे, असे मत संस्थाचालकांनी मांडले.

### आरटीई प्रतिपूर्तीमध्येही भ्रष्टाचार?

हा निधी शाळांना देण्यासाठी गटशिक्षणाधिकारी स्तरावरून २ ते ५ टक्के रक्कम कमिशन म्हणून मागितली जात असल्याचाही आरोप करण्यात आला.राज्यातील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. सरकारची चुकीची धोरणे, चुकीच्या निर्णयांचा फटका विद्यार्थी, शिक्षक, संस्थाचालकांना बसत आहे. शिक्षण विभाग भ्रष्टाचाराने पोखरला असून, विद्यमान सरकारने विविध विभागांचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवून शिक्षक, संस्थाचालक आणि गोरगरीब विद्यार्थ्यांना आर्थिक संकटात टाकल्याचा गंभीर आरोप राज्यातील शिक्षण संस्थाचालकांनी पत्रकार परिषदेत केला.

# मुख्याध्यापक पदासाठीच्या संचमान्यता निकषात बदल

## शाळांतील मुख्याध्यापक पदासाठी किती विद्यार्थी अनिवार्य?

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील पहिली ते पाचवी, पहिली ते दहावी, आठवी ते दहावी, आठवी ते बारावीच्या शाळांतील मुख्याध्यापक पदासाठीच्या संचमान्यता निकषात बदल करण्यात आला आहे. आता नव्या निर्णयानुसार मुख्याध्यापक पदासाठी शंभर विद्यार्थी असणे आवश्यक असल्याचे निश्चित करण्यात आले आहे.**

पदनिश्चितीच्या प्रचलित धोरणामध्ये अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांतील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निश्चित करण्याबाबतचा निर्णय १५ मार्च २०२४ रोजी घेतला होता. त्यात मुख्याध्यापक पदासाठी १५० विद्यार्थिसंख्या निश्चित करण्यात आली होती. मात्र या निर्णयाला राज्यभरातून विरोध करण्यात आला. त्यानंतर त्यात आता सुधारणा करून मुख्याध्यापक पदासाठी शंभर विद्यार्थी असणे आवश्यक, तर पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी किमान विद्यार्थिसंख्या ९० असणे



आवश्यक असल्याचा निर्णय घेण्यात आला.मुख्याध्यापकाचे पद अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना संबंधित व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये मुख्याध्यापक पदावर समायोजित करावे, समायोजनानंतरही त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक पद अतिरिक्त ठरत असल्यास संबंधित मुख्याध्यापकांना त्यांच्या कार्यरत ठिकाणी ते निवृत्त होईपर्यंत किंवा पटसंख्येत वाढ होईपर्यंत कायम ठेवावे, मुख्याध्यापकांच्या निवृत्त किंवा अन्य तत्सम कारणांनी पद रिक्त झाल्यानंतर संबंधित शाळेस सुधारित निकषांनुसार पटसंख्येअभावी मुख्याध्यापकाचे पद लागू होत नसल्यास ते पद रद्द करावे, असे नमूद करण्यात आले आहे. . पायाभूत पदांपेक्षा वाढीव होणाऱ्या शिक्षकांच्या पदांच्या बाबतीत शासनाची मंजुरी आवश्यक असेल.

### 90 विद्यार्थिसंख्या आवश्यक

हा बदल वगळता उर्वरित निकष, आदेश लागू राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, शिक्षण विभागाच्या २०१५च्या निर्णयानुसार मुख्याध्यापक पदासाठी १०० विद्यार्थिसंख्या आणि पद टिकवण्यासाठी ९० विद्यार्थिसंख्या आवश्यक होती. मात्र, या निर्णयात बदल करून विद्यार्थिसंख्या १५० करण्यात आली होती. या निर्णयाला विरोध करण्यात आला होता. त्यामुळे आता मुख्याध्यापक पदासाठी पूर्वीचाच नियम लागू होणार आहे. मुख्याध्यापक हे शाळा प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहे. त्यामुळे राज्यातील शाळांतील मुख्याध्यापकांची पदे टिकण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. तसेच शाळा तेथे मुख्याध्यापक असणे आवश्यक आहे

## पर्यावरण विभागाची 'एनओसी' अखेर मिळाली; इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला

# महायुती सरकारचा 'ग्रीन सिग्नल'!

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवडकरांसह राज्यातील वारकरी सांप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणीच्या पुनरुज्जीवनासाठी राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. नदी सुधार प्रकल्पासाठी आवश्यक असलेली पर्यावरण विभागाची बहुप्रतिक्षीत 'एनओसी' अर्थात ना हरकत दाखला मिळाला आहे. त्यामुळे प्रकल्पाची कार्यवाही सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी २०१७ मध्ये महानगरपालिका निवडणुकीच्या वेळी "भोसरी व्हीजन-२०२०" अभियान हाती घेतले होते. त्यामध्ये 'नमामी गंगा' प्रकल्पाच्या धर्तीवर 'नमामी इंद्रायणी' प्रकल्प हाती घेण्याचा संकल्प करण्यात आला होता.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आळंदी नगरपरिषद, पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) या स्थानिक स्वराज्य संस्थांसह राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा (डीपीआर) मंजूर करण्यात आला आहे. इंद्रायणी नदीची शहरातील लांबी : २०.६ किमी असून, नदी काठची एक बाजू महापालिका व दुसरी बाजु पीएमआरडीए कार्यक्षेत्रात येते. त्यामुळे नदीसुधार प्रकल्प संयुक्तपणे राबवण्यात येत आहे.

> "भारतीय संस्कृतीमध्ये नदीला मातास्वरुप मानले आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा विषय अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. प्रकल्पाच्या 'डीपीआर'पासून पालिका ते पार्लमेंट सातत्याने पाठपुरावा केला. २०१८ मध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून सल्लागार नियुक्ती झाली. पण, राज्यातील महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात अडीच वर्षे हा विषय प्रलंबित राहीला. तसेच, तांत्रिक अडचणींमुळे पर्यावरण विभागाची 'एनओसी' लांबवणीवर पडली होती. याबाबत आम्ही विधिमंडळ अधिवेशन आणि राज्याचे नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली होती. त्याला यश मिळाले आहे. आता लवकरच प्रकल्पाच्या निविदा प्रसिद्ध करुन कामाला सुरूवात करता येणार आहे. "भोसरी व्हीजन- २०२०" अंतर्गत पाहिलेले आणखी एक स्वप्न "नमामी इंद्रायणी" प्रकल्पाला आता बळकटी आहे, याचा आनंद आहे. प्रशासनाने हा प्रकल्प लवकरात लवकर सुरू करावा, अशी अपेक्षा आहे.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### 'कन्सेप्ट मास्टर प्लॅन' ला मिळाली बळकटी...

आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने २०१८ मध्ये 'नमामी इंद्रायणी' प्रकल्पाचा 'डीपीआर' मंजूर करण्यात आला. मात्र, राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाची 'एनओसी' प्रलंबित होती.

त्यामुळे विधानसभा अधिवेशनामध्ये आमदार लांडगे यांनी सातत्याने आवाज उठवला. त्याला यश मिळाले. प्रशासनाने टोपोग्राफी सर्व्हे, जिओटेक्निकल सर्व्हे, बेसमॅप, लॅन्डयुज, प्रकल्प आराखडा, नकाशे तसेच कन्सेप्ट मास्टर प्लॅन तयार केला आहे.

आता कन्सेप्ट मास्टर प्लॅनसाठी राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाच्या समितीकडून पर्यावरण ना हरकत दाखला (ENVIRONMENTAL CLEARANCE) मिळणे आवश्यक होते. आता प्रकल्पाच्या निविदा प्रसिद्ध करुन कामाला सुरूवात करता येणार आहे.

---

## समाज माध्यमांद्वारे आमदारांबाबत अफवा पसरविणाऱ्यांची चौकशी करा..!

## माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप आणि चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी जगताप यांच्यासंदर्भात जाणीवपूर्वक अफवा आणि खोटे वृत्त पसरविण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामाध्यमातून भारतीय जनता पक्षालाही नाहक बदनाम करण्याचे षडयंत्र दिसून येत आहे. त्यामुळे अशाप्रकारे खोटे वृत्त पसरविणाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, भारतीय जनता पक्षाचे माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांनी केली आहे.**





यासंदर्भात नामदेव ढाके यांनी पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आणि निवेदन दिले आहे.

सदर निवेदनात ढाके यांनी म्हंटले आहे की, दोन दिवसांपूर्वी बुधवारी (दि. १८ सप्टेंबर) व्हाट्सअप या समाजमाध्यमावर ९३७३९४१३८१ या मोबाईल क्रमांकावरून भारतीय जनता पक्षाच्या आमदार अश्विनी जगताप आणि त्यांच्यासमवेत पक्षाचे २० नगरसेवक पक्ष सोडणार असल्याचे खोटे वृत्त पसरविण्यात आले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपाला बदनाम करण्यासाठीचा हा खोडसाळपणा सदर मोबाईलधारकाने जाणीवपूर्वक केला. भाजप शहराध्यक्ष, आमदार, २० नगरसेवक यांचे कोणतेही पत्र अथवा संमती नसताना देखील अशाप्रकारचे खोटे वृत्त समाजमाध्यमांद्वारे पसरवून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करणे व पक्षाची आणि शहराध्यक्ष तथा आमदार यांची प्रतिमा मलिन हा चुकीचा हेतू सदर मोबाईलधारकाचा दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित मोबाईलक्रमांक धारकाची सखोल चौकशी करून त्याच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नामदेव ढाके यांनी पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

### यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या...

सदर निवेदनावर माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, संतोष कांबळे, हर्षल ढोरे, शारदा सोनवणे, माधवी राजापुरे, अंबरनाथ कांबळे, महेश जगताप, उषा मुंढे, शशिकांत कदम, सागर आंघोळकर, निर्मला कुटे, शत्रुघ्न उर्फ बापू काटे, आरती चोंधे, ममता गायकवाड, कांतीलाल भूमकर, झामाताई बारणे, अभिषेक बारणे, मनीषा पवार, तानाजी बारणे, संदीप गाडे, नीता पाडाळे, विनोद तापकीर, देविदास पाटील, सविता खुळे, बाबासाहेब त्रिभुवन, संदीप नखाते, राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, मोरेश्वर शेडगे, विठ्ठल भोईर, अश्विनी चिंचवडे, सचिन चिंचवडे, करुणा चिंचवडे, मोनाताई कुलकर्णी, बिभीषण चौधरी, संगीता भोंडवे, बाळासाहेब ओव्हाळ आदी माजी नगरसेवक, स्वीकृत सदस्य, पदाधिकारी यांच्या या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# आतिशी सिंग वरिष्ठांच्या चौकटीत राहतील?




**अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनापासून दिल्ली वेगळ्याच अर्थाने चर्चेत आहे. तर त्यानंतर झालेल्या राजकीय बदलानंतर दिल्लीचे नाव माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याभोवती फिरत आहे. असो, आपण महिलांना नेतृत्व मिळत नाही अशी चर्चा नेहमी करतो. सध्या मात्र दिल्लीची धुरा एका महिलेकडे आली आहे.**

उच्चशिक्षित, विवेकी, अभ्यासू चौकसबुद्धी असलेल्या आतिशी सिंग यांच्याकडे आम आदमी पक्षाने या पदाची धुरा सोपविली आहे. आता त्या संधीचे सोने करतील की, वरिष्ठांच्या चौकटीत राहून काम करतील, हे पाहण्यासारखे असेल. आतिशी मार्लेना सिंग यांचा जन्म ८ जून १९८१ साली झाला. सामाजिक कार्यापासून कारकीर्द सुरू करू आता त्या मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचल्या आहेत. खरे तर अरविंद केजरीवाल तुरुंगात असताना सुद्धा आपच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांनी आपचा करिष्मा कायम ठेवला. एकनिष्ठ कार्यकर्त्यांची फळी हा आम आदमी पार्टीचा कणा ठरला. वरिष्ठ नेत्यांना एकापाठोपाठ अटक होत असताना, सरकारची विश्वासार्ह कायम ठेवण्यात या कार्यकर्त्यांनीच मोलाचा हातभार लावला आणि त्यात आतिशी आघाडीवर होत्या. आज आतिशी या एक राजकारणी म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्या मूळच्या




उच्चशिक्षित सामाजिक कार्यकर्त्या आहेत. राजकीय कार्यकर्ता म्हणून जेव्हा त्यांची इनिंग सुरू झाली तेव्हा त्या दिल्लीच्या जनतेत लोकप्रिय झाल्या. एक नवीन स्वच्छ प्रतिम मतदारांसमोर उभी राहिली. तसाही आम आदमी पक्षाला दिल्लीत मोठा पाठिंबा होताच. दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीत कालकाजी या विधानसभा मतदारसंघातून आतिशी सिंग निवडून आल्या. सामाजिक कार्यकर्त्या, राजकीय कार्यकर्ता, दिल्ली विधानसभेच्या सदस्य आणि आता थेट राजधानी दिल्लीच्या मुख्यमंत्री अशा पायऱ्या त्या चढत गेल्या. आम आदमी पक्षानेही त्यांना पुढे जाण्यास प्रोत्साहन दिले. नवनवीन संधी दिल्या. विविध पदांवर नियुक्ती करून जबाबदारी घेण्यास सक्षम केले. आज आतिशी यांचे पक्षातील स्थान अनन्यसाधारण आहे. त्या आम आदमी पक्षाच्या राजकीय घडामोडी समितीच्या सदस्य आहेत आणि दिल्ली सरकारमध्ये शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, संस्कृती आणि पर्यटन मंत्री आहेत.

जुलै २०१५ ते १७ एप्रिल २०१८ या कालावधीत दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या मुख्यतः शिक्षणविषयक सल्लागार म्हणून त्यांनी काम केले. अभ्यासू, उच्चशिक्षित, प्रखर वक्तृत्व असलेल्या आतिशी सिंग या दिल्लीच्या आठव्या मुख्यमंत्री आणि तिसऱ्या महिला मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. दिल्लीत वाढलेल्या आतिशी सिंग यांनी स्प्रिंगडेल्स स्कूल (पुसा रोड), नवी दिल्ली येथे शालेय शिक्षण घेतले. २००१ मध्ये सेंट स्टिफन्स कॉलेज, दिल्ली येथून इतिहासात पदवी प्राप्त केली. त्यानंतर लगेचच, त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात २००३ मध्ये चेव्हनिंग शिष्यवृत्तीवर इतिहासात पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. आतिशी सिंग यांनी काही काळ आंध्र प्रदेशातील ऋषी व्हॅली विद्यालयात अध्यापन कार्य केले. तिथे त्यांनी सेंद्रीय शेती आणि प्रगतिशील शिक्षण प्रणाली यासारख्या कामांत सहभाग घेतला आणि अनेक स्वयंसेवी संस्थांबरोबर काम केले. मध्यप्रदेशातील भोपाळजवळील एका छोट्या गावात त्यांनी सामाजिक कार्य केले. जानेवारी २०१३ मध्ये आम आदमी पक्षासाठी धोरणे तयार करण्यात आतिशी यांचा सहभाग होता. २०१५ मध्ये मध्य प्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील जल सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला. या आंदोलनादरम्यान आणि त्यानंतर झालेल्या कायदेशीर लढाईत आप नेते आणि कार्यकर्त्यांना त्यांनी पाठिंबा दिला. २०२० च्या निवडणुकीनंतर त्यांनी आपच्या गोवा युनिटच्या प्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आतिशी यांची पूर्व दिल्लीच्या लोकसभा प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून आपच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती, मात्र भाजपचे उमेदवार गौतम गंभीर यांच्याकडून त्या चार लाख ७७ हजार मतांच्या फरकाने पराभूत झाल्या.

## प्रासंगिक »

### होऊन जाऊ दे..!

***विद्यमान सत्ताधीशांच्या लोकशाही निष्ठांविषयी संदेह नसला तरीसुद्धा, 'एक अमुक, एकच तमुक' असल्या विषयांच्या आकलनशक्तीबाबत मात्र संशय व्यक्त करणे आवश्यक ठरते...***

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी 'एक देश एक निवडणूक' प्रकल्पाचा अहवाल केंद्र सरकारला सादर केला आणि सरकारने तो स्वीकारला. हे म्हणजे ताटातले वाटीत किंवा वाटीतील ताटात पडावे असे. रामनाथरावांकडे या प्रकल्पाची सूत्रे जेव्हा केंद्र सरकारने दिली तेव्हा त्याबाबतच्या अहवालातून काय निष्पन्न होईल याबाबत पुरता अंदाज येथील मुंगीमेंदूधारकांसही आलेला होता. तसेच झाले. अर्थात दुसरे काही होण्याची, सुचवण्याची या रामनाथरावांची काय प्राज्ञा? तशी ती असती तर सरकार म्हणेल त्या ठिकाणी शिक्का उमटवण्याच्या कामी त्यांची रवानगी राष्ट्रपती भवनात होती ना. तेथील त्यांची कामगिरी उत्तम. त्यामुळे 'एक देश एक निवडणूक' प्रकल्पाचा हवा तसा अहवाल तयार करण्याची 'महत्त्वपूर्ण' जबाबदारी त्यांच्याकडे सुपूर्द केली गेली. तीही त्यांनी किती चोख बजावली हे अहवालावरून दिसते.

राज्यातील घरगुती तसेच औद्योगिक वीज ग्राहकांसाठी स्मार्ट आणि प्रीपेड वीज मीटर लावण्याची योजना आणली जात आहे. असे करणे भविष्यकाळाच्या दृष्टीने फायदेशीर असल्याचे सांगून ही योजना ग्राहकांवर थोपवली जात आहे. हे स्मार्ट मीटर लावले जावेत की नाही यावर दोन्ही बाजूंनी मते मांडली जात आहेत.

# 'स्मार्ट' मीटर लावणे 'शहाणपणा'चे आहे का?

मुळात स्मार्ट मीटर हवे की नको असा प्रश्न न मांडता सद्या परिस्थितीमध्ये सुमारे २७ हजार कोटी आर्थिक भांडवल गुंतवण्याइतकी ही योजना लाभकारक आहे का, वीज ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी इतर ठिकाणी गुंतवणूक करावी का असे प्रश्न विचारणे जास्त सयुक्तिक वाटते. स्मार्ट मीटर योजनेचे जे संभाव्य फायदे सांगितले जात आहेत त्यांकडे ग्राहकाच्या दृष्टिकोनातून बघताना काय दिसते?स्मार्ट मीटरचा सर्वप्रथम थेट परिणाम असा असेल की प्रत्येक महिन्याला प्रत्यक्ष जाऊन मीटर वाचन करण्याची गरज राहणार नाही. एका स्मार्ट मीटरचा दहा वर्षांचा खर्च १२,५०० रुपये सांगितला जात आहे. याचा अर्थ दरमहा एका मीटर वाचनासाठी १०० रुपये! यापेक्षा प्रत्यक्ष मीटर वाचन करणे निश्चितच स्वस्त पडेल हे पटायला अर्थशास्त्रज्ञ असण्याची गरज नाही. मुळात वीज देयक तयार करण्यासाठी दरमहा मीटर वाचन करायची गरजच



नसते. अनेक युरोपीय देशांमध्ये (हो, प्रगत देशांतदेखील) सहामाही मीटर वाचन करण्याची पद्धत आहे. तिथे दरमहा प्रत्येकाच्या सरासरी वापरानुसार वसुली करून सहा महिन्यांतून एकदा फरकाचे देयक काढले जाते. आपल्याकडे ऋतूनुसार वर्षातून तीन वेळा मीटर वाचन केले तरी पुरेसे ठरेल. त्याहून पुढे जाऊन महावितरणचा हट्टच असेल तर साध्या मीटरमध्येदेखील मागील सहा महिन्यांची प्रतिमहा नोंद ठेवण्याची सोय करता येईल.प्रीपेड स्मार्ट मीटर लावल्यानंतर वीज देयक वेळेत न भरणाऱ्या ग्राहकांची वीज कापता येईल. सध्या वास्तविकता अशी आहे की वीज देयक वेळेत न भरणाऱ्यांची वीज महावितरण कोणत्याही सूचनेशिवाय सर्रास कापते. काही भागांमध्ये सुरक्षेच्या काळजीमुळे असे करणे शक्य होत नाही असे सांगितले जाते. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात कायदा सुव्यवस्थेची अशी परिस्थिती असणे दयनीय आहे. ही वास्तविकता घटकाभर मान्य केली तरी अशी परिस्थिती अगदीच मर्यादित भागांमध्ये असणार. त्यासाठी राज्यभर स्मार्ट मीटर लावणे योग्य ठरणार नाही. अक्षय ऊर्जा स्रोत, जसे की सौर ऊर्जा आणि पवनऊर्जा, यांच्यापासून होणारी वीजनिर्मिती निसर्गावर अवलंबून असते आणि त्यात सतत चढउतार होतात. या स्रोतांपासून होणारी वीजनिर्मिती जशी वाढत जाईल तसे नियोजनासाठी वीज वापराची तासवार आकडेवारी उपयोगी ठरेल. हे तत्त्वत: मान्य करू. तरीही त्यासाठी फक्त लाखभर रोहित्रांवर स्मार्ट मीटर लावले तरी पुष्कळ होईल, यासाठी अडीच कोटी घरांचे मीटर बदलले तर आजारापेक्षा औषध जालीम ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# उद्योग महाराष्ट्राबाहेर जाणं हा अपप्रचार!

## रीन्यू पॉवरचा दाखला देत फडणवीसांचं प्रत्युत्तर

।मुंबई।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे व कारखाने गुजरातला गेल्याचं पाहायला मिळालं आहे. यावरून विरोधी पक्ष सातत्याने राज्य सरकारवर टीका करत आहे. मात्र, राज्यातील उद्योगधंदे राज्याबाहेर गेले नाहीत असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. तसेच त्यांनी म्हटलं आहे की उद्योग महाराष्ट्राबाहेर जाणं हे विरोधकांनी तयार केलेलं नरेटिव्ह (अपप्रचार) आहे. ते आता तोंडावर पडले आहेत. एका बाजूला फडणवीसांनी दावा केला आहे की कोणताही उद्योग राज्याबाहेर गेलेला नाही. उलट फडणवीसांनी विरोधी पक्षांवरच तोंडसुख घेतलंय. आशातच पुन्हा एकदा राज्यातील एक उद्योग राज्याबाहेर गेल्याची बातमी समोर आली आहे.**



"महाराष्ट्रात येणारा आणखी एक प्रकल्प गुजरातला गेला आहे. नागपूरमध्ये सोलर पॅनल प्रकल्प येणार होता. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रात १८ हजार कोटींची गुंतवणूक होणार होती. राजकीय आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे हा प्रकल्प राज्याबाहेर गेल्याची माहिती पुढे आली आहे", असं विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. 'हिंदू-मुस्लीम वाद, जीभ कापा-जिभेला चटके द्या, पक्ष फोडा, आमदार पळवा, सतत असे निरर्थक उद्योग करणारं महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कॉर्पोरेट कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणं कठीण झालं आहे. त्यामुळे हा प्रकल्प गुजरातेत गेल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले,"आमचा विरोधी पक्ष सातत्याने महाराष्ट्राची बदनामी करत आहे रिन्यू पॉवर प्लान्ट महाराष्ट्रातून गुजरातला गेला असा अप्रचार त्यांनी केला. मात्र आता रिन्यू पॉवर प्लान्ट कंपनीने एक निवेदन जारी केलं आहे. त्याद्वारे त्यांनी सांगितलं आहे की "आम्ही महाराष्ट्रातच आहोत. आम्ही महाराष्ट्रातून कुठेही जाणार नाही. उलट आम्ही येथील गुंतवणूक वाढवणार आहोत. आम्ही राज्याला एक वचन दिले आहे, जे तंतोतंत पाळणार आहोत'. रिन्यू पॉवर प्लान्टच्या या निवेदनामुळे विरोधी पक्ष तोंडावर पडला आहे".विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे की काँग्रेस पक्ष व आम आदमी पार्टीने ईद-ए-मिलाद निमित्त मदिना मुनव्वराची प्रतिमा असलेले बॅनर लावले होते. मात्र आमदार झिशान सिद्दिकी यांचा स्वीय सहाय्यक आझम रिझवी, त्याच्या सहकाऱ्यांनी फाडून ते फेकले त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणी कारवाई करावी.राजकीय आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे हा प्रकल्प राज्याबाहेर गेल्याची माहिती पुढे आली आहे", असं विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. 'हिंदू-मुस्लीम वाद, जीभ कापा-जिभेला चटके द्या, पक्ष फोडा, आमदार पळवा, सतत असे निरर्थक उद्योग करणारं महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कॉर्पोरेट कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणं कठीण झालं आहे. त्यामुळे हा प्रकल्प गुजरातेत गेल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले,"आमचा विरोधी पक्ष सातत्याने महाराष्ट्राची बदनामी करत आहे रिन्यू पॉवर प्लान्ट महाराष्ट्रातून गुजरातला गेला असा अप्रचार त्यांनी केला. उलट आम्ही येथील गुंतवणूक वाढवणार आहोत. आम्ही राज्याला एक वचन दिले आहे, जे तंतोतंत पाळणार आहोत'. रिन्यू पॉवर प्लान्टच्या या निवेदनामुळे विरोधी पक्ष तोंडावर पडला आहे". विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे की काँग्रेस पक्ष व आम आदमी पार्टीने ईद-ए-मिलाद निमित्त मदिना मुनव्वराची प्रतिमा असलेले बॅनर लावले होते. मात्र आमदार झिशान सिद्दिकी यांचा स्वीय सहाय्यक आझम रिझवी, त्याच्या सहकाऱ्यांनी फाडून ते फेकले त्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणी कारवाई करावी. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे व कारखाने गुजरातला गेल्याचं पाहायला मिळालं आहे. यावरून विरोधी पक्ष सातत्याने राज्य सरकारवर टीका करत आहे. मात्र, राज्यातील उद्योगधंदे राज्याबाहेर गेले नाहीत असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच त्यांनी म्हटलं आहे की उद्योग महाराष्ट्राबाहेर जाणं हे विरोधकांनी तयार केलेलं नरेटिव्ह (अपप्रचार) आहे.

### 18 हजार कोटींची गुंतवणूक होणार

नागपूरमध्ये सोलर पॅनल प्रकल्प येणार होता. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रात १८ हजार कोटींची गुंतवणूक होणार होती. राजकीय आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे हा प्रकल्प राज्याबाहेर गेल्याची माहिती पुढे आली आहे", असं विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. 'हिंदू-मुस्लीम वाद, जीभ कापा-जिभेला चटके द्या, पक्ष फोडा, आमदार पळवा, सतत असे निरर्थक उद्योग करणारं महायुती सरकार महाराष्ट्रात असल्यामुळे जगभरातील कॉर्पोरेट कंपन्या आणि उद्योगांना राज्यात उद्योग करणं कठीण झालं आहे.

# तर माझ्याऐवजी प्रकाश आंबेडकरांना मंत्री करा

## आठवलेंचं प्रकाश आंबेकरांना महायुतीत येण्याचं आवाहन

।मुंबई।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रीपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) आहेत. तसेच ते गेल्या आठ वर्षांपासून केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री देखील आहेत. आठवलेंचा पक्ष हा बहुजन समाजाचं प्रतिनिधित्व करणारा एनडीएतील प्रमुख पक्ष आहे. दरम्यान, आठवले यांनी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांना एनडीएत सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे.**

विशेष म्हणजे प्रकाश आंबेडकरांसाठी आठवले यांनी केंद्रीय मंत्रिपद सोडण्याची तयारी देखील दर्शवली आहे.रामदास आठवले म्हणाले,"वंचित बहुजन आघाडीने थोडा सकारात्मक विचार करणं आवश्यक आहे. वंचितने महायुतीत (एनडीए) येणं आवश्यक आहे, त्यांना माझं निमंत्रण आहे. ते महायुतीत आले तर त्यांना सत्तेचा फायदा होईल. ते आले तर मला मंत्री नाही केलं तरी चालेल, प्रकाश आंबेडकर यांना मंत्री करा अशी मागणी मी स्वतः करेन".दरम्यान, महायुतीतील काही नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटात जाणार असल्याची चर्चा चालू आहे. त्यावर आठवले म्हणाले, "ज्यांना विधानसभा निवडणुकीचं तिकीट मिळेल याची खात्री नाही ते शरद पवार यांच्याकडे जात आहेत. आम्ही याचा अत्यंत बारकाईने अभ्यास करत आहोत".केंद्र सरकार एक राष्ट्र एक निवडणूक या कार्यक्रमावर जोर देत आहे. तर विरोधकांनी त्यास विरोध दर्शवला आहे. यावर रामदास आठवले म्हणाले, "पूर्वी वन नेशन वन इलेक्शन अशी प्रणाली होती. संविधानात अशी तरतूद होती. सुरुवातीला काही निवडणूका अशाच झाल्या आहेत. त्यामुळे देशाचा फायदा होणार आहे, हा काही हुकूमशाही आणण्याचा विषय नाही. या विधेयकाला माझ्या पक्षाचा पाठींबा आहे"."विधानसभा निवडणुकीत आम्ही महायुतीकडे १० ते १२ जागा मागणार आहोत,. असं रामदास आठवले यावेळी सांगितलं.



### 18 जागांची मागणी करणार आहोत

विधानसभेला आम्हाला भाजपाच्या कोट्यातून १० ते १२ जागा मिळाव्यात आणि सरकार आलं तर आम्हाला १ ते २ मंत्रिपदे मिळावित, महामंडळं मिळावित अशी अपेक्षा आहे. विधानसभेत आरपीआयचा विचार करावा, आम्हाला डावलू नये, याबाबत मी देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी आम्हाला भाजपाच्या कोट्यातील समजू नये, तिघांनी मिळून जागा द्यावीत. २३ सप्टेंबर रोजी आमचं शिष्टमंडळ भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटणार आहे. त्यावेळी आम्ही १८ जागांची मागणी करणार आहोत.

# त्यांचं घर म्हणजे अर्धे पाकिस्तान आहे!

## भाजपाचं काँग्रेसबाबत विधान; न्यायालयानं खडसावलं!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्नाटकमध्ये एकीकडे उच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तींनी 'बंगळुरूमध्ये पाकिस्तान' असल्याचं केलेलं विधान चर्चेत असताना दुसरीकडे भाजपाच्या एका आमदारानं कर्नाटक सरकारमधील काँग्रेसचे आरोग्य मंत्री दिनेश गुंडू राव यांच्याबाबत केलेलं विधान वादात सापडलं आहे. या विधानाचा वाद थेट कर्नाटक उच्च न्यायालयापर्यंत पोहोचला असून न्यायमूर्ती एम. नागाप्रसन्ना यांनी भाजपा आमदार बासनागौडा पाटील यतनाल यांना परखड शब्दांत खडसावलं आहे.**




दिनेश गुंडू राव यांच्या पत्नी तबू राव यांनी पोलिसांत यतनाल यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्याआधारे पोलिसांनी यतनाल यांच्याविरोधात गुन्हा नोंद केला होता. "बासनागौडा पाटील यतनाल यांनी दिनेश गुंडू राव यांचं घर म्हणजे अर्धे पाकिस्तान आहे असं विधान केलं होतं. भारतीय जनता पक्ष नेहमीच 'भारत माता' म्हणून उल्लेख करत असतो. पण ते महिलांचा सन्मान करू शकत नाहीत. जर ते दिनेशबद्दल बोलले तर मला त्यावर काहीही आक्षेप नाही. कारण ते राजकारणात आहेत. पण या सगळ्यामध्ये मला ओढलं जाणं मला आवडत नाही. माझ्या मुस्लीम पार्श्वभूमीसाठी मला लक्ष्य केलं जात असल्याचा आता मला वैताग आला आहे", असं तबू राव यांनी म्हटलं होतं.यतनाल यांनी या वर्षी एप्रिल महिन्यात गुंडू राव यंच्याबाबत केलेल्या विधानामुळे ते अडचणीत आले आहेत. गुंडू राव यांनी तेव्हा यतनाल यांच्याबाबत सोशल मीडियावर पोस्ट करून टीका केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना यतनाल यांनी गुंडू राव यांच्याबाबत विधान केलं होतं. "गुंडू राव यांचं घर म्हणजे अर्धे पाकिस्तान आहे. त्यामुळे देशविरोधी विधानं करणं ही त्यांची सवय आहे", असं ते म्हणाले होते. दरम्यान, त्यांच्या तक्रारीनंतर हे प्रकरण आता कर्नाटक उच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आलं असून न्यायमूर्ती एम. नागाप्रसन्ना यांच्या एकसदस्यी खंडपीठासमोर त्यावर सुनावणी चालू आहे. यतनाल यांनी आपल्याविरोधातील कारवाईला स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी याचिका न्यायालयात केली आहे. या सुनावणीदरम्यान, न्यायमूर्तींनी भाजपा आमदार बासनागौडा पाटील यतनाल यांना फैलावर घेतलं."अर्धे पाकिस्तान म्हणजे काय? तुम्हाला हे का म्हणायचं आहे? तुम्ही एखाद्या समाजाला अशा प्रकारे बोलू शकत नाही. ही पद्धत योग्य नाही. मी प्रत्येक प्रकरणाच्या सुनावणीवेळी हे सांगतोय.

### खंडपीठाने काय म्हटलं?

बंगळुरू उच्च न्यायालयात २८ ऑगस्ट रोजी विम्याशी संबंधित एका प्रकरणाची सुनावणी घेत असताना न्यायाधीश श्रीशानंद यांनी ही टिप्पणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे की "कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी अनावश्यक टिप्पणी केली होती". सरन्यायाधीश म्हणाले, "आपण काही मूलभूत मार्गदर्शक तत्वे ठरवू शकतो. यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या महासचिवांनी अहवाल सादर करावा".सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठात न्यायमूर्ती एस. खन्ना, बी. आर. गवई, एस. कांत आणि एच. रॉय यांचा समावेश होता. खंडपीठाने याप्रकरणी म्हटलं आहे की "समाजमाध्यमं सक्रीयपणे न्यायालयीन कार्यवाहीचा प्रचार करत आहेत.

एकमेकांवर अशी चिखलफेक करण्यात काय अर्थ आहे. फक्त एखाद्याची पत्नी मुस्लीम आहे, याचा अर्थ तुम्ही त्यांना अर्ध-पाकिस्तानी म्हणाल?" असा सवाल न्यायमूर्तींनी यावेळी विचारला.आठवड्याभरापूर्वीच न्यायमूर्ती नागाप्रसन्ना यांनी राजकीय वर्तुळात होणाऱ्या वैयक्तिक स्वरूपाच्या टीकांवर नाराजी व्यक्त केली होती. "हल्ली राजकारणी राजकीय स्वरूपाच्या धोरणांवर टीका करण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर एकमेकांवर वैयक्तिक स्वरूपाची टीका करू लागले आहेत", असं ते म्हणाले होते.कर्नाटक उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व्ही. श्रीशानंद यांनी बंगळुरूमधील एका मुस्लिमबहुल परिसराला 'पाकिस्तान' म्हटल्यामुळे त्यांच्यावर जोरदार टीका होत आहे. पश्चिम बंगळुरूमधील गोरीपाल्या या परिसराला न्यायाधीशांनी पाकिस्तान असं संबोधलं होतं. श्रीशानंद यांच्या टिप्पणीनंतर एका बाजूला त्यांच्यावर टीका होत असतानाच सर्वोच्च न्यायालयाने देखील या प्रकरणाची दखल घेतली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने न्यायालयीन शिष्टाचार पाळण्याच्या आवश्यकतेवर जोर दिला.

# सर्वोच्च न्यायालयाचं यूट्यूब चॅनल हॅक?

## कोलकाता बलात्कारसह महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाच्या यूट्यूब चॅनलवर शुक्रवारी दुपारी अचानक सलग जाहिराती चालू झाल्या. काही युजर्सला क्लिक केल्यानंतर थेट दुसऱ्याच कुठल्यातरी यूट्यूब चॅनलवर जावं लागत असल्याचा अनुभव समोर आला. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचं यूट्यूब चॅनल हॅक झालं असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



एक दिवसपूर्वीच कोलकाता प्रशिक्षणार्थी डॉक्टर बलात्कार व हत्या प्रकरणाची सुनावणी प्रक्षेपित न करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली होती. यासह काही महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात चालू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत यूट्यूब चॅनलवर शुक्रवारी दुपारी अचानक अमेरिकेतील एक कंपनी 'रिपल लॅब'ची जाहिरात सलग चालू झाल्याचं काही युजर्सला पाहायला मिळालं. ही

### भलत्याच युट्यूब चॅनलवर जावं लागत

अर्थात, सर्वोच्च न्यायालयाच्या यूट्यूब चॅनलवर असणारे आधीचे व्हिडीओही सामान्य प्रेक्षक व युजर्सला पाहाता येणार नाहीत. दरम्यान, ज्या रिपल लॅब कंपनीची जाहिरात त्यांच्या प्रमुखांच्या छायाचित्रासह यूट्यूब चॅनल्स हॅक करून त्यावर चालवली जात आहे, त्या कंपनीनंही यासंदर्भात आपण त्रस्त असल्याचं यूट्यूबला वारंवार कळवलं आहे. तसेच, या कंपनीनं यासंदर्भात कोणतीही कारवाई होत नसल्याबाबत नाराजी व्यक्त करतानाच यूट्यूबविरोधात याचिकाही दाखल केल्याचं बार अँड बेंचच्या वृत्तात नमूद करण्यात आलं आहे.

अमेरिकेतील एक क्रिप्टोकरन्सी सुविधा पुरवारी कंपनी आहे. एएनआय व बार अँड बेंच या प्रकाराबाबतचं वृत्त एक्सवरील अधिकृत सोशल मीडिया हँडलवर दिलं आहे.न्यायालयाच्या यूट्यूब चॅनलच्या लिंकवर क्लिक केल्यानंतर भलत्याच यूट्यूब चॅनलवर जावं लागत असल्याचाही अनुभव आला.

# बिल्किस बानोवरील चित्रपटाला जिओ देत नाहीय परवानगी!

सध्या जगभरात बिल्कीस बानो प्रकरण चर्चेत आहे. बिल्कीस बानो प्रकरणातील दोषीची शिक्षा गुजरात सरकारने रद्द केली, त्यासंदर्भात काल सर्वोच्च न्यायालयाने निकाल देत गुजरात सरकारचा निर्णय रद्द केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी मोठा निकाल देत ११ दोषींची सुटका नाकारली आहे. आता एकीकडे या प्रकरणाची चर्चा असताना आता बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतने बिल्किस बानो प्रकरणावर चित्रपट तयार करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बिल्किस बानो प्रकरणात सोमवारी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर बिल्किस बानो प्रकरणाला वेगळे वळण मिळाले तर त्यानंतर कंगना रणौतने तिच्या अधिकृत X



अकाऊंटवर या प्रकरणाबाबत ट्विट केले आहे. कंगनाच्या एका चाहत्यानं तिला विचारले की, 'कंगना, तू नेहमी महिलांच्या हक्कांबद्दल बोलतेस. महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी काम करते. मला तुला हे विचारायचे आहे की, तुला 'बिल्किस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे का? स्त्रीवादासाठी नाही, एक स्त्री म्हणून तुला तिची कथा जगासमोर आणायला आवडेल का?' कंगना राणौतने देखील या चाहत्यांच्या ट्विटर उत्तर देताना लिहिले की, 'मला 'बिल्कीस बानो'वर चित्रपट बनवायचा आहे आणि गेल्या तीन वर्षांपासून या चित्रपटाच्या स्क्रिप्टवर काम करत आहे. त्याबाबत मी संशोधन करत आहे. यासाठी मी सर्व ओटीटी प्लॅटफॉर्मशी संपर्क साधला, मात्र प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या कारणाने चित्रपटाला नकार दिला.'

# श्रेया कुळकर्णीचा 'डिलिव्हरी बॉय



जळगावच्या अभिनेत्री श्रेया कुळकर्णीने हिंदी व मराठी मालिकांसह मराठी चित्रपटांमध्येही काम केले आहे. ती एक मॉडेल सुद्धा आहे. गेले अनेक दिवस तिच्या नव्या चित्रपटाची अर्थात 'डिलिव्हरी बॉय'ची चर्चा सगळीकडे रंगलेली होती. आता हा चित्रपट पुढील महिन्याच्या ९ तारखेला प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात ती एक आगळीवेगळी भूमिका साकारताना दिसणार आहे. श्रेया कुळकर्णीचा प्रदर्शित होणाऱ्या डिलिव्हरी बॉय या चित्रपटात ती एका आव्हानात्मक महिलेच्या भूमिकेत दिसणार आहे. श्रेयाने ही भूमिका साकारण्यासाठी अथक मेहनत घेतली आहे. शालन असे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव आहे. ही एका गर्भवती महिलेची भूमिका आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना एका नवीन वैज्ञानिक शस्त्रक्रियेबाबत माहिती देणारा आहे. श्रेयाच्या अभिनयाचा हा एक मोठा टप्पा असून अभिनयाची आवड जोपासायला तिला ती कुटुंबीयांकडून नेहमीच सहकार्य मिळते. आई-वडिलांबरोबरच सासरच्या मंडळींनीही नेहमीच अभिनयासाठी प्रोत्साहन दिले आहे, असे श्रेया सांगते. आई आरती कुलकर्णी आणि वडील राजेंद्र कुलकर्णी यांनी लहानपणापासून तिची ही आवड जोपासली. श्रेया अभिनेत्री असून एक सॉफ्टवेअर इंजिनिअरदेखील आहे. ळगावसारख्या छोट्याशा शहरातून येऊन मुंबईच्या मायानगरीत आपले स्थान बनवायला तिला खूप संघर्ष करावा लागला. “डिलिव्हरी बॉय ” हा चित्रपट एका संवेदनशील विषयावर भाष्य करणारा आहे. या चित्रपटात श्रेयाबरोबरच प्रथमेश परब, पृथ्वीक प्रताप आदी कलाकारही काम करीत आहेत. मोहसीन खान या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.

# सुष्मिताच्या 'आर्या 3 'चा दमदार टीझर आऊट

बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेन (SUSHMITA SEN) पुन्हा एकदा ओटीटी (OTT) विश्व गाजवण्यासाठी सज्ज आहे. सुष्मिताची 'आर्या 3' (AARYA 3) ही बहुप्रतीक्षित सीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या सीरिजचा दमदार टीझर समोर आला आहे. आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर सुष्मिता प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. शेरनी येण्याची वेळ आता आली आहे. सुष्मिताच्या 'आर्या' आणि 'आर्या 2' या वेबसीरिजने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. आता 'आर्या 3'च्या माध्यमातून धमाका करण्यासाठी सुष्मिता सज्ज आहे. 'आर्या 3' ही सीरिज 9 फेब्रुवारी 2024 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हॉटस्टारवर ही सीरिज प्रेक्षकांना पाहता येईल. 2020 मध्ये आलेल्या 'आर्या' या सिनेमाच्या माध्यमातून सुष्मिताने अभिनयक्षेत्रात कमबॅक केलं होतं. तर या सीरिजच्या माध्यमातून अभिनेत्रीने ओटीटी विश्वात पदार्पण केलं होतं. या सीरिजमधील सुष्मिताच्या भूमिकेचं खूप कौतुक झालं. आपल्या मुलांच्या संरक्षणासाठी जगासोबत भांडताना अभिनेत्री दिसून आली होती.

'आर्या 3'च्या टीझरमध्ये सुष्मिता सेन म्हणत आहे,"आखिरी सांस लेनेसे पहले वह आखिरी झटका जरूर मारेगी".

या सीरिजबद्दल बोलताना सुष्मिता म्हणाली,"आर्याचं माझ्या हृदयात एक वेगळं स्थान आहे. या सीरिजचा प्रत्येक भाग हा कमाल आहे. आता या सीरिजमध्ये एक वेगळी आर्या तुम्हाला पाहायला मिळणार आहे. या भूमिकेने मला खूप काही दिलं आहे.



# पापाराझीवर भडकला सैफ अली खान

प्रसिद्ध अभिनेता सैफ अली खान (SAIF ALI KHAN) आणि अभिनेत्री करीना कपूर खान (KAREENA KAPOOR KHAN) हे बॉलिवूडमधील प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक आहे. दोघेही अनेकदा त्यांच्या मुलांसोबत स्पॉट होतात.पापाराझी अनेकवेळा सैफ आणि करिनाचे फोटो क्लिक करतात. नुकताच सैफ हा करीना आणि त्याचा मुलगा जेह यांच्यासोबत स्पॉट झाला. यावेळी काही पापाराझींनी जेह आणि सैफचे फोटो क्लिक केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये सैफ हा पापाराझीवर भडकलेला दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये सैफ पापाराझींना फटकारताना दिसत आहे. व्हिडीओमध्ये दिसते की, सैफ हा त्याचा धाकटा मुलगा जेह याचा हात धरून स्टेडियममधून बाहेर येतो. यादरम्यान पापाराझी त्यांचे फोटो काढतात. पण सैफला ही गोष्ट अजिबात आवडत नाही आणि मग तो पापाराझींवर चिडतो. तो म्हणतो, "एक सेकंद भाईसाहेब, आधी लाइट्स बंद करा... इथे मुलं फुटबॉल खेळत आहेत आणि तुम्ही लोक याला फिल्मी इव्हेंट बनवत आहात." सैफ अली खान आणि करीना कपूर हे स्टेडियममध्ये पोहोचले होते जिथे त्यांची दोन मुले तैमूर आणि जेह हे फुटबॉल खेळत होते. काही दिवसांपूर्वी सैफ, करीना, तैमूर आणि जेह हे हॉलिडेला गेले होते. सैफ अली खानचा आदिपुरुष हा चित्रपट गेल्या वर्षी रिलीज झाला.

# रिव्ह्यू घेणं टाळणं कोहलीला पडलं महागात!

## रोहित शर्मा आणि अंपायरची प्रतिक्रिया होतेय व्हायरल

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**बांगलादेशविरुद्धच्या चेन्नई कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावातही विराट कोहली स्वस्तात बाद झाला. पहिल्या डावात विराटने ६ धावा केल्या तर दुसऱ्या डावात विराट कोहली १७ धावा करत बाद झाला. पण दुसऱ्या डावात विराट कोहलीने अशी काही चूक केली की ज्याचा टीम इंडियाला फटका बसला आहे. विराट कोहलीला मैदानावरील पंचांनी बाद दिल्यानंतर रिव्ह्यू करण्याची संधी होती, पण त्याने रिव्ह्यू घेतला नाही आणि प्रतिस्पर्धी संघाला विकेट भेट म्हणून दिली. मात्र, दुसऱ्या डावात त्याने १७ धावा करत घरच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १२ हजार धावा पूर्ण करण्याचा पराक्रम केला.**



पहिल्या डावात फ्लॉप ठरल्यानंतर विराट कोहलीला दुसऱ्या डावात मोठी धावसंख्या उभारण्याची संधी होती आणि तो क्रीजवर स्थिरावला होता. ३७ चेंडूंचा सामना करताना कोहलीने २ चौकारांच्या मदतीने १७ धावा केल्या होत्या आणि तो हळूहळू डाव पुढे नेत होता, पण दुसऱ्या डावातील २०व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर तो मेहदी हसन मिराजच्या चेंडूवर पायचीत झाला. कोहलीने मिराजचा चेंडू ऑन-साईडच्या दिशेने फ्लिक करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या डाव्या पायाच्या पॅडला लागला. यानंतर गोलंदाजासह सर्वांनीच जोरदार अपील केले आणि अंपायरने त्याला बाद घोषित केले.कोहलीही यानंतर दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या शुबमन गिलशी रिव्ह्यूबद्दल बोलायला आला, मात्र गिलला खात्री नव्हती आणि त्यानंतर कोहलीने रिव्ह्यू घेतला नाही आणि मैदानाबाहेर निघून गेला. कोहलीच्या पॅडवर चेंडू आदळण्यापूर्वी त्याच्या बॅटला लागला होता, असे नंतर रिप्लेमध्ये दिसून आले. रिप्ले पाहिल्यानंतर रोहित शर्माही नाराज दिसत होता आणि त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट असं जाणवत होतं की विराट कोहलीने रिव्ह्यू घेतला पाहिजे होता. तर स्क्वेअर लेगवर उभे असलेले अंपायर रिचर्ड केटलबरो यांनी मोठ्या स्क्रीनवर रिप्ले पाहिल्यानंतर एक वेगळीच स्माईल दिली. कोहलीने रिव्ह्यू घेतला असता तर तो नाबाद राहिला असता आणि त्याला मोठी खेळी खेळता आली असती.विराट कोहलीच्या विकेटनंतर ऋषभ पंत आणि शुबमन गिल भारताचा डाव सांभाळत आहेत. भारताने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३ बाद ८१ धावा केल्या आहेत आणि भारताकडे एकूण ३०८ धावांची आघाडी आहे. ऋषभ पंत १२ धावा तर शुबमन गिल ३३ धावा करत मैदानात कायम आहेत. हे दोघेही उद्या भारताच्या डावाची सुरुवात करतील.पहिल्या डावात फ्लॉप ठरल्यानंतर विराट कोहलीला दुसऱ्या डावात मोठी धावसंख्या उभारण्याची संधी होती आणि तो क्रीजवर स्थिरावला होता. ३७ चेंडूंचा सामना करताना कोहलीने २ चौकारांच्या मदतीने १७ धावा केल्या होत्या आणि तो हळूहळू डाव पुढे नेत होता, पण दुसऱ्या डावातील २०व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर तो मेहदी हसन मिराजच्या चेंडूवर पायचीत झाला. कोहलीने मिराजचा चेंडू ऑन-साईडच्या दिशेने फ्लिक करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या डाव्या पायाच्या पॅडला लागला. यानंतर गोलंदाजासह सर्वांनीच जोरदार अपील केले आणि अंपायरने त्याला बाद घोषित केले.कोहलीही यानंतर दुसऱ्या टोकाला उभ्या असलेल्या शुबमन गिलशी रिव्ह्यूबद्दल बोलायला आला, मात्र गिलला खात्री नव्हती आणि त्यानंतर कोहलीने रिव्ह्यू घेतला नाही आणि मैदानाबाहेर निघून गेला. कोहलीच्या पॅडवर चेंडू आदळण्यापूर्वी त्याच्या बॅटला लागला होता, असे नंतर रिप्लेमध्ये दिसून आले. रिप्ले पाहिल्यानंतर रोहित शर्माही नाराज दिसत होता आणि त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट असं जाणवत होतं की विराट कोहलीने रिव्ह्यू घेतला पाहिजे होता. तर स्क्वेअर लेगवर उभे असलेले अंपायर रिचर्ड केटलबरो यांनी मोठ्या स्क्रीनवर रिप्ले पाहिल्यानंतर एक वेगळीच स्माईल दिली. कोहलीने रिव्ह्यू घेतला असता तर तो नाबाद राहिला असता आणि त्याला मोठी खेळी खेळता आली असती.बांगलादेशविरुद्धच्या चेन्नई कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावातही विराट कोहली स्वस्तात बाद झाला. पहिल्या डावात विराटने ६ धावा केल्या तर दुसऱ्या डावात विराट कोहली १७ धावा करत बाद झाला. पण दुसऱ्या डावात विराट कोहलीने अशी काही चूक केली की ज्याचा टीम इंडियाला फटका बसला आहे. विराट कोहलीला मैदानावरील पंचांनी बाद दिल्यानंतर रिव्ह्यू करण्याची संधी होती, पण त्याने रिव्ह्यू घेतला नाही आणि प्रतिस्पर्धी संघाला विकेट भेट म्हणून दिली.

### अश्विनचे कारकिर्दीतील जलद शतक

मात्र, दुसऱ्या डावात त्याने १७ धावा करत घरच्या मैदानावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १२ हजार धावा पूर्ण करण्याचा पराक्रम केला.बांगलादेशविरुद्धच्या चेन्नई कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावातही विराट कोहली स्वस्तात बाद झाला. पहिल्या डावात विराटने ६ धावा केल्या तर दुसऱ्या डावात विराट कोहली १७ धावा करत बाद झाला. पण दुसऱ्या डावात विराट कोहलीने अशी काही चूक केली की ज्याचा टीम इंडियाला फटका बसला आहे. विराट कोहलीला मैदानावरील पंचांनी बाद दिल्यानंतर रिव्ह्यू करण्याची संधी होती, पण त्याने रिव्ह्यू घेतला नाही आणि प्रतिस्पर्धी संघाला विकेट भेट म्हणून दिली.

# कोहलीने चेन्नई कसोटीत घडवला इतिहास

## तेंडुलकरनंतर 'ही' कामगिरी करणारा पहिला भारतीय फलंदाज

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना चेन्नईमध्ये खेळवला जात आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारतीय संघाने ३ विकेट्स गमावत ८१ धावा केल्या आहेत. यासह भारताने पहिल्या कसोटीत ३०१ धावांची आघाडी मिळवली आहे. दुसऱ्या डावात फलंदाजी करताना विराट कोहली १७ धावा करत बाद झाला.**



पण या १७ धावांच्या खेळीतही विराटने एक मोठी कामगिरी केली आहे. तो एका विशेष यादीत सामील झाला आहे, ज्यामध्ये भारताचा खेळाडू म्हणून फक्त सचिन तेंडुलकरच्या नावाचा समावेश आहे.चेन्नई कसोटी काही विराटसाठी काही खास राहिली नाही. कारण या कसोटीत विराटला फार मोठी धावसंख्या उभारता आली नाही. पहिल्या डावात तो केवळ ६ धावा करून बाद झाला. तर दुसऱ्या डावात विराट कोहली १७ धावा करत बाद झाला. या दुसऱ्या डावातील फलंदाजीदरम्यान ५ धावा करताच त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

### 12 हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण

त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाचा रिकी पाँटिंग १३११७ धावांसह या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. जॅक कॅलिसनेही दक्षिण आफ्रिकेत १२३०५ धावा केल्या होत्या. त्याचबरोबर कुमार संगकारालाही श्रीलंकेत १२०४३ धावा करण्यात यश आले. आता या महान खेळाडूंच्या यादीत विराट कोहलीचाही समावेश झाला आविराटने जर या मालिकेत आणखी ३५ धावा केल्या तर तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २७ हजार धावा पूर्ण करेल.

विराट कोहलीने भारतात १२ हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या आहेत. अशी कामगिरी करणारा तो भारताचा दुसरा फलंदाज ठरला आहे. त्याचवेळी, विराट हा जगातील केवळ ५वा फलंदाज आहे, ज्याने आपल्या घरच्या मैदानावर १२ हजार आंतरराष्ट्रीय धावा केल्या आहेत. घरच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिन तेंडुलकरने भारतात एकूण १४,१९२ धावा केल्या होत्या पहिला कसोटी सामना चेन्नईमध्ये खेळवला जात आहे.